# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U / 128 / 2008 /49/**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri S.N. Jagdhane,
Surana Apartment,Opp.Bhaji Mandi Aurangpura,Aurangabad
( Consumer No. 490010756291 )

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri S.N. Jagdhane, Surana Apartment,Opp.Bhaji Mandi Aurangpura,Aurangabad ( Consumer No. 490010756291 )

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 18.09.2008 at 15.00 Hrs.**

**Encl As above**.

Member/Secretaty
CGRF,MSEDCL,Aurangabad

Copy to :
Shri S.N. Jagdhane,
Surana Apartment,
Opp.Bhaji Mandi Aurangpura,
Aurangabad

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२८/२००८/४९**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०२/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- ०३/११/२००८**

**श्री एस.एन.जगधणे,**
**सुराणा आपार्टमेट,भाजी मंडई जवळ,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०७५६२९१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०९/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १८/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असून ते राहत असलेल्या इमारतीत एकुण २० सदनिका आहेत.तेथील मिटरच्या जोडण्या व्यवस्थित नसल्यामुळे त्यांना सतत चुकीच्या बिलाची आकारणी करण्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांना देण्यात आलेले वीज बिल हे त्यांच्या सरासरी वापरापेक्षा जास्त असल्याचे सांगत या चूकीच्या वीज बिलाची दुरूस्ती करून व्याज व दंड न लावण्याचे आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०२/०९/२००८ रोजी मंचासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी ग्राहक श्री एस.एन.जगधणे तसेच नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला जबाब मंचात दाखल केंला व ग्राहकाने एप्रिल २००८ मध्ये देण्यात आलेले १७२२ युनिट चे वीज बिल हे त्यांनी तीन महिन्यात विभागुन देण्यात असल्याचे सांगत त्यांनी ग्राहकाच्या वीज बिलातुन रूपये ११०४.५७/-कमी केल्याचे आपल्या जबाबात पुढे म्हटले आहे. ग्राहकाच्या मिटरसाठी करण्यात आलेली सुधारीत वायरींग व्यवस्थित नसल्याबाबत नोडल अधिकारी यांनी आपल्या जबाबात काहीही म्हटले नसल्यामुळे त्यांना स्थळपाहणी अहवाल, सी.पी.एल., मिटर बदली अहवाल दाखल करण्याचे सांगण्यात आले व पुढील सुनावणी २३/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक २३/०९/२००८ रोजी नोडल अधिकारी कोणतीही कागदपत्रे मंचात दाखल न केल्यामुळे मंचाने स्वतः स्थळ पाहणी करण्याचा निर्णय घेतला व नोडल अधिकारी आणि ग्राहक यांच्या उपस्थितीत दि.२३/०९/२००८ रोजी स्थळ पाहणी केली व सुनावणीची पुढील तारीख दिनांक ३०/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक ३०/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार उपस्थित नव्हते नोडल अधिकारी यांनी ही सुनावणी पुढे ढकलण्याबाबत विनंती अर्ज दाखल केला मंचाने या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०७/१०/२००८ ठेवण्याचे निश्चीत केले.

५) दिनांक ०७/१०/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. सुनावणी दरम्यान अर्जदाराने त्याचे मिटर बदलण्यात आल्याचे सांगीतले ल्यामुळे नोडल अधिकारी यांना मिटर बदली अहवाल दिनांक १३/१०/२००८ पर्यत मंचात दाखल करण्याचे आदेश देवुन प्रकरण निकाली ठेवण्यात आले.

६) अर्जदार व नोडल अधिकारी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून तसेच प्रत्यक्ष मंचाने स्थळ पाहणी अहवालावरून असे आढळुन येते अर्जदार राहत असलेल्या सुराणा अपार्टमेंट या बहु मजली इमारतीमध्ये एकुण २० सदनिकात राहत असणा-या ग्राहाकांना घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीतर्फे वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे लिप्ट,पाण्याचा पंप व इत्यादी साठी कॉमन थ्री फेज मिटर सुध्दा लावण्यात आले असल्याचे आढळुन आले महावितरणतर्फे या इमारतीत पहिल्या मजल्यावर सर्व ग्राहकांचे एकुण २० मिटर लावण्यात आलेले आहे. वीज पुरवठा करतांना मिटर नंतर एम.सी.बी/किटक्याट लावणे जरूरीचे असते पण या ठिकाणी मिटरनंतर ते कोठेच लावण्यात आलेले आढळुन आले नाही. मिटर मधुन निघालेल्या वीज पुरवठ्याच्या वायरी ह्या दुस-या मजल्यावरील एकाच ठिकाणी असलेल्या एम.सी.बी व बसबार असलेल्या बॉक्स मध्ये गेलेल्या व तेथुनच पुढे इमारतीमध्ये राहत असलेल्या ग्राहकांना वीज पुरवठा दिला असल्याचे स्थळ पाहणी करतांना आढळुन आले. स्थळ पाहणी करतांना उपस्थित असलेल्या संबंधीत विभागाचे कर्मचारी देखील कोणता मिटरचा विज प्रवाह कोठे जात आहे हे स्पष्टपणे व खात्रीपुर्वक दाखवु शकले नाहीत.

७) महावितरण कंपनीतर्फे ०६/१०/२००७ रोजी अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेले मिटर क्रमांक ८०४७७७३ हे बदलुन त्या जागी ७४३०२९ या क्रमांकाचे नविन मिटर बसविण्यात आले पण प्रत्यक्षात सी.पी.एल.मध्ये या बदलाची नोंद ही डिसेम्बर २००७ मध्ये घेण्यात आल्याचे दिसुन येते. मिटर बदलतांना जुन्या मिटरची रिडींग ९०१० अशी असल्याचे मिटर बदली फार्मवरून दिसुन येते प्रत्यक्षात अर्जदारास ऑक्टोबर २००७ ते नोव्हेबर २००७ या काळात सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले असल्याचे दिसुन येते. ऑक्टोबर २००७ ते फेब्रुवारी २००८ या पाच महिन्याच्या कालावधीत अर्जदाराचा एकुण वीज वापर ५०३ युनिट असल्यचे आढळुन येते, फेब्रुवारी २००८ मध्ये अर्जदाराची मागिल व चालु रिडींग ५०३ व ५०३ दाखविण्यात आली असून मार्च २००८ ची मागिल रिडींग २ चालु रिडींग ८० तर एप्रिल २००८ मध्ये मागील रिडींग ८० चालु रिडींग १८०२ अशी दाखविण्यात आलेली आढळते. या काळात मिटर बदलेले नसतांना देखील अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारणी केल्याचे दिसुन येते.

८) दिनांक २१/०६/२००८ रोजी अर्जदाराचे मिटर बदलतांना नविन मिटर वरील रिडींग ही ०००१ अशी होती मंचातर्फे दिनांक ०१/०९/२००८ रोजी महावितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या पाहणी अहवालावरून व मिटर वरील रिडींग००४२३ अशी असल्याचे आढळुने यावरून दिनांक २१/०६/२००८ ते ०१/०९/२००८ या काळात अर्जदारास वीज वापर (४२३-१) ४२२ युनिट असल्याचे आढळुन येते.

९) वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास एप्रिल २००८ ते ऑगष्ट २००८ या काळात चुकीच्या पध्दतीने वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे मंचाचे मत आहे. अर्जदाराचा मागील बारा महिन्याचा सरासरी वीज वापर हा १३० युनिट असा असल्यामुळे त्यास याप्रमाणे वीज बिल आकारणी करणे योग्य ठरेल असे मंचाचे मत आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेले एप्रिल २००८ ते ऑगष्ट २००८ या काळातील वीज बिल रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने वरील कालावधीसाठी अर्जदारास सरासरा १३० युनिट प्रतिमहा या प्रमाणे वीज बिल आकारणी करून ३० दिवसाच्या आत अर्जदारास सुधारीत वीज बिल द्यावे.

३) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देताना त्यात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

४) अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारून त्यांना दिलेंल्या मानसिंक त्रासापोटी महावितरण कंपनीने रूपये २५०/- तीस दिवसाच्या आत द्यावे.

५) अर्जदार राहत असलेल्या इमारतीतील सर्व ग्राहकांच्या जवळ एम.सी.बी/किटकॅट बसवावे व त्या ठिकाणी ग्राहकाचे नांव व ग्राहक क्रमांक टाकावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२८/२००८/४९** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री एस.एन.जगधणे,**
**सुराणा आपार्टमेट,भाजी मंडई जवळ,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०७५६२९१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१२८/२००८/४९ )

आपण दिनांक ०२/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**